# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- https://kbmc.gov.in


जावक क्रमांक/कु-ब.न.प./नरवि/ २२० /२०२२-२०२३ दिनांक: ०६ /०२ /२०२३

अपेंडीक्स - I

## बांधकाम पूर्णतेचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र

प्रति,
**श्री.अविनाश दत्तात्रय पातकर यांचे कु.मु.प.धारक**
**मे.साई प्रॉपर्टीज तर्फे भागीदार श्री.प्रकाश भोजराज शेवानी व श्री.समीर प्रकाश शेवानी**
**द्वारा श्रीमती एस.आर.खंबायत (वास्तुशिल्पकार), कुळगांव-बदलापूर**

श्रीमती एस.आर.खंबायत (वास्तुशिल्पकार) बदलापूर, बांधकाम परवाना क्र.सीओ/२००१/२७२५९ यांचे दि.१०/०१/२०२३ रोजीचे अर्जावरुन दाखला देण्यात येतो की, त्यांनी कुळगांव-बदलापूर नगरपरिषद हद्दीत स.नं.६९/७/२/अ, मौजे जोवेली, ता.अंबरनाथ, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचे कडील बांधकाम परवानगी क्र.कुबनप/बांप/५५३१-३७, दि.२७/०६/२०२२ अन्वये मंजूर केलेल्या नकाशे प्रमाणे राहणेसाठी व वाणीज्यसाठी बांधकाम पूर्ण केलेले आहे. तरी खालील अटींवर बांधकाम पूर्णतेचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे. (बांधकाम पूर्ण झाल्याची तारीख ०१/१२/२०२२)

| मजले | इमारत | | | | | वापर |
|---|---|---|---|---|---|---|
| १) तळमजला | ७ दुकाने | -- | -- | -- | -- | रहिवास + वाणीज्य |
| २) पहिला मजला | -- | ३ | सदनिका | ९ | खोल्या | |
| ३) दुसरा मजला | -- | ३ | सदनिका | ९ | खोल्या | |
| ४) तिसरा मजला | -- | ३ | सदनिका | ९ | खोल्या | |
| ५) चौथा मजला | -- | ३ | सदनिका | ९ | खोल्या | |
| एकुण- | ७ दुकाने | १२ | सदनिका | ३६ | खोल्या | |

**सबब, वरील जागेतील इमारत श्रीमती.एस.आर.खंबायत, वास्तुशिल्पकार यांच्या देखरेखीखाली पूर्ण झालेली आहे, झालेले बांधकाम हे किरकोळ फेरबदलासह पूर्ण केलेले आहे. सदरचे बदल हे नियमानुसार असल्याने खालील अटींचे अधीन राहून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

१ जेव्हा सज्जा (बाल्कनी) बंदिस्त करण्यात आला/आली असेल तर त्याचे समोरील व वरील १/३ क्षेत्रासाठी, लुवर्स ग्लास, शटर्स अथवा ग्रील्स लावणे, अनिवार्य राहील व पॅरोपेट सोडून उर्वरित समोरील क्षेत्रासाठी ग्लेजड शेटर्स बंदिस्त करणे आवश्यक राहील. तसेच नकाशात दर्शविलेले कॉर्नेस, ओर्नामेंटल प्रोजेक्शन बंदिस्त करणेत येऊ नये.

२ तळमजल्यास व टेरेस फ्लोअरला इलेवेशनल प्रोजेक्शन/ कॉर्नीस/ फ्लॉवरबेड असतील तर ते बंदिस्त करणे अनुज्ञेय असणार नाही. तसेच आजूबाजूच्या सामासिक अंतरात कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

३ भोगवटा प्रमाणपत्र सोबत दर्शविलेले नकाशातील बांधकामा व्यतिरिक्त इतर बांधकाम हे अनधिकृत समजण्यात येवून त्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४ भविष्यात सामासिक अंतरातील जागा नगरपरिषदेस रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक भासल्यास हस्तांतरीत करावी लागेल. टेरेस व पॉकेट टेरस बंदिस्त करु नये.

५ पावसाळी पाणी वाया जावू नये यासाठी रेनवॉटर हार्वेस्टिंग करणेत यावे व पाणी जमीनीमध्ये मुरवावे.

६ सुका व ओला कचरा अलगीकरणासाठी व साठा करण्यासाठी स्वतंत्रपणे जागा निर्धारित करुन कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी संयंत्र उभारण्याची जबाबदारी विकासकाची आहे.

नगर रचनाकार
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

मुख्य अधिकारी तथा नियोजन प्राधिकारी
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

कुळगांव - बदलापूर नगरपालिका, ठाणे
कुळगांव

प्रत, कर विभाग, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद